# एम.बी.मोरे महीला महाविदयालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा शुभारंभ

विदयार्थ्यांच्या कला गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणा-या शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील एम. बी. मोरे फाउंडेशनच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविदयालयाच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या महोत्सवाला सुरूवात झाली.

सोमवार दि. ०९ डिसेबंर २०१९ रोजी यातील सांस्कृतिक सप्ताहाचा शुभारंभ झाला. या सप्ताहात प्रत्येक दिवशी विविध मनोरंजनात्मक स्पर्धा प्रश्नमंजुषा, मेहींदी स्पर्धा, फनीगेम्स, अंताक्षरी स्पर्धा, रांगोळी, पोस्टर स्पर्धा इ. स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. तसेच प्रत्येक दिवशी खास आकर्षण म्हणून दर दिवशी विदयार्थीनींना ड्रेस कोड देखील देण्यात आले.

या महोत्सवामध्ये महीला महाविदयालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सौ. दर्शना शिंदे आणि त्यांचे सहकारी प्रा. दिपेश भोसले यांनी विदयार्थीनींना प्रत्येक दिवसाच्या आयोजनाची जबाबदारी वाटून दिली तसेच जातीने लक्ष घालून हा सप्ताह मोठया उत्साहात साजरा केला.

महीला महाविदयालयाच्या या शैक्षणिक वर्षातील सांस्कृतिक महोत्सवाची सांगता शनिवार ०४ जानेवारी २०२० रोजी, आयोजित केलेल्या ‘कलागुणदर्शन’ कार्यक्रमाने होईल.

Scanned by CamScanner